राठी भाषिकांच्या विचारांचे प्रतिनिधित्व करणारे दैनिक

ISO : 9001-2008 Certified Compar

प्रमुख संपादक : अभिजीत

# मुंबई मित्र

RNI No. MAHMAR/2005/21175 • POSTAL Regd. No. MH/MR/NW-129/2008-10 | Website : www.mumbaimitra.com • www.vastmedia.org • Vijjsi Media Network Pvt. Ltd.

वर्ष : ५ अंक : १८० मुंबई, [illegible] २०१० पाने : १२ किंमत २/- रु.

## करियरमध्ये यश म्हणजे चेहऱ्यावरचे हास्य व मनाचे समाधान : प्रा. नवले

**मुंबई :** 'परीक्षा पास होणे किंवा अधिकाधिक गुण मिळविणे म्हणजेच यश नव्हे. परीक्षेत नापास होऊन किंवा कमी गुण मिळूनही आयुष्यात हिमालयाची उंची गाठलेले सचिन तेंडुलकर, लता मंगेशकर, थॉमस अल्वा एडीसन, किशोरकुमार, बहिणाबाई चौधरी असे अनेक लोक समाजात होऊन गेले व आहेत त्यांचा आदर्श तरुणांनी घेतला पाहिजे. करियरच्या तणावाचे ओझे न वाहता ज्या क्षेत्रात आपल्याला आनंद मिळेल काम करताना कंटाळा येणार नाही, असे क्षेत्र विद्यार्थ्यांनी करियरसाठी निवडावे. 'करियरमध्ये यश म्हणजे चेहऱ्यावरचे हास्य व मनाचे समाधान' असे यश प्रा. विजय नवले यांनी अ.भा.वि.प.तर्फे आयोजित विद्यार्थी पालक जनजागृती कार्यक्रमात व्यक्त केले.

अ.भा.वि.प.तर्फे दिनांक २८ जानेवारी २०१० रोजी अरविंद गंडभीर कनिष्ठ महाविद्यालय पाटकर महाविद्यालय, रवींद्र भारती कनिष्ठ महाविद्यालय व कुलदीप सिंह दीवान रात्र महाविद्यालयात विद्यार्थी आत्महत्या रोखण्यासाठी मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात प्रा. विजय नवले बोलत होते. ते बोलताना पुढे म्हणाले की, आज अनेक कारणांमुळे विद्यार्थी तणावाखाली येतो आणि आत्महत्येकडे वळतो. पण जीवन खूप सुंदर आहे त्याला जगायला शिकले पाहिजे. प्रत्येक अडचणीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून बघायला हवे. एका उद्योगपतीने लिहून ठेवले आहे की, 'आयुष्यात मोठे व्हायचे असेल तर आयुष्यात एकदा खूप मोठा आघात व्हायला पाहिजे असेही प्रा. नवले म्हणाले.

'विद्यार्थ्यांनी मन खंबीर करण्यासाठी व्यायाम व प्राणायाम केले पाहिजे. त्याचबरोबर वाचन, अवलोकन आणि अधिकाधिक लोकांशी संवाद साधला पाहिजे. पालकांच्या अपेक्षाचे ओझे मनावर न ठेवता आपल्याला मजा कुठे येते त्या क्षेत्रात विद्यार्थ्यांनी जायला हवे. केवळ वर्गातीलच शिक्षण म्हणजे शिक्षण नव्हे तर कट्टा, कॉलेज कॅम्पस, मटकती खेळणे या गोष्टीसुध्दा आपण अनुभवायला हव्या यातून परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडायला मदत होते, असेही ते म्हणाले. अ.भा.वि.प.तर्फे मुंबईतील अन्य शाळा व महाविद्यालयात याचे व्याख्यान सुरू राहणार आहेत.